जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/११/२०२३
## दि.१४/११/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे.३६७/२०२३,भादविक ३०७,५०४,५०६,महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३), १३५,आर्म ॲक्ट कलम ४(२५)सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम ३,७ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय १८ वर्षे,रा.केशवनगर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/११/२०२३ रोजी रात्री ०८/०० वा.महाराष्ट्र बेकरी शेजारी,जनसेवा बँकेच्या समोर, केशवनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी कच्ची दाबेली खाण्यासाठी गेले असताना,यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे जवळ येऊन,जुन्या भांडणाच्या कारणावरुन त्यांना शिवीगाळ करुन,जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने,फिर्यादी यांचे हातावर व डोक्यावर लाकडी दांडक्याने व लोखंडी हत्याराने वार करुन,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच हातातील हत्यार हवेत फिरवुन सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गाडे ९३२२३९३७३४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ७३३/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ८२ वर्षे,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/११/२०२३ रोजी सकाळी ०६/०० वा.पासुन ते दि.१४/११/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा.श्री.जे.बंगला,सुखसागरनगर नं.२,ग.नं. ३७,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील ३,५०,०००/- रूपये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण ४,००,०००/- रूपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धिरज गुप्ता ९८५०८२०३०७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ११७/२०२३,भादविक ४९८(अ),३०७,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ४२ वर्षे,रा.शिवणे,पुणे |
| **आरोपीत** | सोमनाथ साधु सपकाळ,वय ४५ वर्षे,रा.समर्थ टेरेस,शिवणे,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे ऑक्टोंबर २०२३ ते दि.०८/११/२०२३ रोजीपावेतो समर्थ टेरेस,पहिला मजला,रुम नं.१, प्रेस्टिज स्कुलचे शेजारी,शिवणे,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचे चारित्र्यावर संशय घेवुन,तीला शिवीगाळ व मारहाण करुन तीचा शरिरीक व मानसिक छळ करुन,काही महिन्यांपुर्वी सदर इसमाचा भाऊ हा घरी दारु प्यायला आल्याने,फिर्यादी यांनी त्यांना दारु पिण्याचे कारणावरुन बोलल्याचा राग मनात धरुन,फिर्यादीस जीवे ठार मारण्याचे उद्देशाने तीस कॅल्शीअमचे कॅप्सुल मधुन ब्लेड गिळायला देवुन,ब्लेडचे सहाय्याने तीला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. शुभांगी पवार ८१७७९७९२०३ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ४२६/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)सह १३५, शस्त्र अधिनियम कलम ४(२५),क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कलम ७ |
| **फिर्यादी** | अक्षय गायकवाड,वय २६ वर्षे,रा.गवळीवाडा,खडकी बाजार,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम व त्याचे इतर दोन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/११/२०२३ रोजी रात्रौ १०/३० वा. औंध रोड,रामकुमार किराणा मालाचे दुकाना समोर,पडाळ वस्ती,खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र निलेश, किशन ठाकूर, पप्पु तायडे, सचिन खानझोडे व सोनु डोके यांचेसह पडाळ वस्ती येथे चड्डा यांचे कबुतराचे ढाबळीतील कबुतरे पाहुन,तेथून परत येत असतांना,यातील नमुद इसमांनी जुने भांडणाचे कारणावरून चिडून जाऊन,फिर्यादीचे मित्र निलेश यास इथे कशाला आलात असे विचारले असता,त्याने माझे घर इथेच आहे,मी काय येऊ शकत नाही का असे म्हणाल्याचे कारणावरून चिडुन जावुन,जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्याचे पाठीमागुन डोक्यात धारधार हत्याराने वार करून,त्यास गंभीर जखमी करून, लाथा-बुक्यांनी मारहाण करून,दगडाने डोक्यात मारून,त्यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादी यांचे डाव्या हातास त्यांचे हातातील धारधार हत्याराने जखम झाली. सदर इसमांनी फिर्यादी व त्यांचे मित्रास शिवीगाळ करून,आज याचा शेवटच करू असे म्हणुन त्याचे हातातील कोयता हवेत फिरवुन,तेथे जमलेल्या नागरीकांना मध्ये कोणी पडले तर त्यास संपवुन टाकू अशी धमकी देवुन,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मालोजी कांबळे ९५५२५६१८३५ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३४९/२०२३,भादविक ३७९,५११ |
| **फिर्यादी** | विद्याप्रसाद देवरी,वय-४१,रा.कॅम्प,पुणे |
| **आरोपीत** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/११/२०२३ रोजी रात्रौ ०२/१५ वा.पुर्वी आर्मी परेड ग्राऊंड ऑफीसर क्वाटर्स ब्लॉक नं.१४,चे बाजुला कॅम्प,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सिक्युरिटी गार्ड इन्चार्ज असुन,यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी कॅम्प,पुणे येथील आर्मी परेड ग्राऊंड ऑफीसर क्वाटर्सचे आंत प्रवेश करून,ब्लॉक नं.१४,चे बाजुला चिल्ड्रन पार्कला लागुन असलेले चंदनाचे झाड कापण्याचा प्रयत्न करून,चोरी करून नेण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. सचिन पवार ७०३०४०२५८३ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ४२७/२०२३,भादविक ३०८,३३६,१४३,१४७,१४८,४२७,भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),क्रिमिनल अमेंडमेंट कलम ०७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ४१ वर्षे,रा.खडकी,पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम व त्यांचे इतर साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/११/२०२३ रोजी १०/४५ वा.गल्ली नं.५,चव्हाण वस्ती,औंध रोड,खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे पतीसह त्यांचे वस्ती मध्येच गोळ्या बिस्कीटची टपरी चालवतात. फिर्यादी हया जेवण करून पायी त्यांच्या टपरीकडे जात असताना,यातील नमुद तीन इसम व त्यांचे इतर साथीदार हे नमुद ठिकाणी हुल्लडबाजी करून फिर्यादी यांचे व इतर वाहनांवर दगडफेक करीत होते. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना माझे गाडीवर का दगडफेक करता असे विचारल्याचे कारणावरून त्यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करून, बियरची बाटली फिर्यादीचे |

दिशेने फेकुन,त्यानंतर त्यांचेजवळ असलेल्या लोखंडी हत्यारांनी फिर्यादी यांचे गाडीवर मारून, दोन्ही काचा फोडुन त्यांचे वाहनांचे नुकसान केले आहे. तसेच सदर इसमांनी परत मोटार सायकलवर येवुन,फिर्यादी यांचे समोर राहणारे घराचे दरवाजावर विटा,दगड व बियरच्या बाटल्या फेकुन,त्यांचे हातातील लोखंडी हत्याराने नागरीकांचे दरवाज़ावर मारून दरवाजाचे नुकसान केले. त्यानंतर सर्वजण त्यांचे हातात असलेले हत्यारे हवेत फिरवुन,आरडा ओरडा करून,सदर परीसरात दहशत निर्माण करून,नागरीकांनी रोडवर पार्कींग केलेल्या वाहनांवर दगड मारून व त्यांचेकडे असलेल्या हत्याराने मारून त्यांचे वाहनांचे नुकसान केले.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. अण्णा गुंजाळ ९९७०७४६४५६

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**